


# Vidnyan Kavita

prabhakar jamkhedkar



विज्ञान कविता

विक १-२५

प्रभाकर जामखेडकर

Dr. P. P. JAMKHEDKAR
M.V.Sc.
VETERINARY SERVICE MANAGER

PFIZER LIMITED
EXPRESS TOWERS, NARIMAN POINT
BOMBAY 400 021
PHONE : 232824 GRAM : PFIZER

# वैज्ञानिक कविता

— प्रभाकर जामखेडकर 2
(त्रिक)

## १. तेहतीस कोटी देव

माझ्या पोटाच्या देवळात
तेहतीस कोटी देवांचा वास
नाही ना विश्वास?
घालून सूक्ष्मदर्शक चष्मा—
भेट शिरा गाभाऱ्यात
तेहतीस कोटी देवांचा वास

इथे घेती सूक्ष्मरूप—
शाखाणूंचा, जीवाणूंचा अवतार,
यांच्या नैवेद्याला "घास"
रवंथाच्या घंटानाद,
धूपाचा ढेकर,
विघटनाची करूनी किमया
बाष्पशोषित स्निग्धाम्लांचा देती प्रसाद—
तेहतीस कोटी देवांचा वास

माझ्या रोमांथिकेत
देवांचा चालला यज्ञ
त्यांच्याच देहाच्या समिधा अर्पूनी
ब जीवनसत्त्वांची होत निर्मिती
तेहतीस कोटी देवांचा वास
भक्तांच्या भल्याचा ध्यास
अमृताने भरती कास
माझ्या पोटाच्या देवळात
तेहतीस कोटी देवांचा वास.

मुंबई - १२-३-१९८८

Dr. P. P. JAMKHEDKAR
M.V.Sc.
VETERINARY SERVICE MANAGER

PFIZER LIMITED
EXPRESS TOWERS, NARIMAN POINT
BOMBAY 400 021
PHONE: 232824 GRAM: PFIZER

# वैज्ञानिक कविता

-- प्रभाकर जामखेडकर 2
(निक)

## १. तेहतीस कोटी देव

माझ्या पोटाच्या देवळात
तेहतीस कोटी देवांचा वास
नाही ना विश्वास?
घालून सूक्ष्मदर्शक चष्मा-
भेट घेरा गाभाऱ्यात
तेहतीस कोटी देवांचा वास

इथे घेती सूक्ष्मरूप-
शाखाणूंचा, जीवाणूंचा अवतार,
यांच्या नैवेद्याला "घास"
रवंथाचा घंटानाद,
धूपाचा ढेकर,
विघटनाची करूनी किमया
बाष्पशोषित स्निग्धाम्लांचा देती प्रसाद—
तेहतीस कोटी देवांचा वास

माझ्या रोमंथिकेत
देवांचा चालला यज्ञ
त्यांच्याच देहाच्या समिधा अर्पूनी
ब जीवनसत्त्वांची होत निर्मिती
तेहतीस कोटी देवांचा वास
भक्तांच्या भल्याचा ध्यास
अमृताने भरती कास
माझ्या पोटाच्या देवळात
तेहतीस कोटी देवांचा वास.

मुंबई - १२-३-१९८८

Dr. P. P. JAMKHEDKAR
M.V.Sc.
VETERINARY SERVICE MANAGER

PFIZER LIMITED
EXPRESS TOWERS, NARIMAN POINT
BOMBAY 400 021
PHONE: 232824 GRAM: PFIZER



(विक)

2.

## महाचोर

आम्ही सगळे, परभृत, परजीवी,
दुसऱ्यांच्या ऊर्जेचे खिसे कापून
स्वत:चा निर्वाह करणारे —
वनस्पती करती चोरी
सौरशक्तीची आणि शोषण
भूमीचे — त्यावर ताव
मारिती स्वंथक व अस्वंथक
प्राणी — पण चोरावर मोर —
माणूस — बनतो शिरजोर —
तो तर गळे कापतो वनस्पतींचे
अन् सर्व प्राण्यांचे —
आणि या 'संपूर्ण' चक्रात मी
बनतो 'चक्रम' —

मला नाही उलगडत कोडे —
या ऊर्जाचोरीत तर आम्ही
सारे भुरटे चोर — कारण
तज्ञ म्हणती नवीन ऊर्जा तर
होत नाही तयार — फक्त एका
ऊर्जेचे दूसरीत होते रूपांतर

— तर मग या सूर्याने
कुठून चोरली एवढी ऊर्जा !
तो तर दिसतो महाचोर —

पण कशाला या भानगडीत
पडा ! जोवर आपल्या पोटा-
पुरती मिळते ऊर्जा.

मुंबई - १६-३-१९७८.

Dr. P. P. JAMKHEDKAR
M.V.Sc.
VETERINARY SERVICE MANAGER

PFIZER LIMITED
EXPRESS TOWERS, NARIMAN POINT
BOMBAY 400 021
PHONE: 232824 GRAM: PFIZER



## ३. रक्तपिपासू (टिक)

आम्ही इवले इवले ओबड धोबड
रक्तपिपासू समाजशोषक, समाजकंटक
म्हणूनी हिणवू नका —

आमच्या टिचभर पोराला, थेंबभर
रक्ताचा आधार – पण तेवढं द्यायलाही
तुमची मान कुरकूर

तुमच्या रक्ताच्या एक थेंब, दुसऱ्याचं
जीवन वाचवू शकतो म्हणून टाहो
करीत बाटल्या बाटल्या रक्त गोळा
करणारा तू – थेंबभर रक्ताला
महाग होतोस आमच्यासाठी

पण आम्हीसुध्दा मोरारजीभाईंचे
पक्के चेले – बाटलीला शिवत नाही
रक्त हवे ताजे तवाने धमनी मधले
मारा मारा डीडीटीचा फवारा
किंवा अश्रूधूर सोडा – अन् तुम्ही
तुमच्याच डार्विननं की फार्विनन
सांगितलेलं तत्त्व साफ विसरला —
survival for the fittest —
"लायक तेवढाच जगतो" —
आम्हीच शिकलो त्याच्याकडून —
करा नवीन औषधांचा मारा —
आम्ही देऊ गुंगारा – कारण
आम्हालाही जगायचं आहे.
तुमच्यासारखंच, अन् तुमच्या रक्तावर,
रक्त आमचं अन्न आहे —
नाहीतर बनवा आमच्यासाठी दुसरं अन्न –
म्हणजे आम्ही तुमच्या रक्ताच्या वाट्याला
जाणार नाही.

RESI: DI-80, 1
6, GANDHINAGAR, (MIG COLONY) BANDRA EAST, BOMBAY 400 051. PHONE: 542629

- ३ - १९७८

**Dr. P. P. JAMKHEDKAR**
M.V.Sc.
Reg. No. 393
Maharashtra Vety. Council

PFIZER LIMITED
EXPRESS TOWERS, NARIMAN POINT,
BOMBAY 400 021
PHONE . 232824 GRAM : PFIZER

(विक)

साडे तीन शहाणे

मी तर अर्धा शहाणा
उत्तर तीन शहाणे, कोणी कोल्हापूर प्रश्नांचा.
कधी निर्माण झाली कुणास ठाऊक!
पण सृष्टी झाली निर्माण एकदाची!
— आणि विकासाच्या गर्भी लागला वाद -
— का, कुणास ठाऊक, पण विकसित विकसित -
सूक्ष्मातून विकसला मानवी मेंदू — अक्कलेच्या पेंड

— मेंदू वाढला वाढला जडला त्याला रोग - विचाराचा -
की जन्मा आधीपासूनच मेंदू होता रोगट - माहित नाही मला -
विचारू लागला प्रश्न वेगवेगळ्या भाषांतून, —
गणिताच्या, शास्त्राच्या, शब्दांच्या, कलेच्या —
मला झाले पाहिजे ज्ञान — ज्ञान विश्वाच्या गुह्याचे

— पहिला शहाणा ऋषी, करता करता ध्यान,
ज्ञानाची लागली तहान — म्हणे उकलले गूढ —
अंतरात्म्याच्या डोहात
केला देव त्याने निर्माण — पाहू लागले तिथले तद्रूप [illegible]
— दुसरा शहाणा कलावंत — रंग, सूर, अक्षरे — जणू हा दुसरा ब्रह्मा प्रतिभेचा!
म्हणे 'दुनी' केली निर्माण
— तिसरा शहाणा वैज्ञानिक — याचा ढंग चिकित्सक
नसते ते धरावे गृहीत — प्रयोगाच्या पडताळ्याने पोचवीत —
कालचे सत्य, आणावे आज उजेडात, —
उद्या असत्य ठरविण्यासाठी -
— उरला अर्धा शहाणा — तो सामान्य जन, त्यालाही झाले ज्ञान!
जगासमोर प्रश्नच काय!
फक्त 'सहा' प्रश्नांत गूढ
कोणी, केव्हा, कसे, कोठे, कां, काय
उत्तर देता देता गेला गांगरून
एकेक प्रश्नाच्या उत्तरात — पुन:पुन्हा लपली तेच उत्तरे
हे अर्ध्या शहाण्याला सुचले उत्तर —
सांगा प्रश्न विचारणारी कुठन -
जेव्हा येईल विकसित मेंदूत -
तेव्हा कदाचित उकलेल गूढ.

[illegible]
मुंबई २/१/९१

— प्रभाकर जामखेडकर

**Dr. P.P. JAMKHEDKAR**
M.V.Sc., Ph.D.
Reg. No. 393
Maharashtra Vety. Council

PFIZER LIMITED
EXPRESS TOWERS, NARIMAN POINT,
BOMBAY 400 021
PHONE: 2022824. GRAM: PFIZER

(विक)

# जनावरे आणि माणसे

मी गुरांचा डॉक्टर
म्हणून मला विचारतात —
माणसात आणि जनावरात फरक काय!

मी उत्तर देतो —
चार पायांवर येणारे सगळे माझे पेशंट —
एकाच वेळी दोन 'जण' आल्यास आम्ही करतो उपचार!

मुख्य फरक मेंदूचा —
प्रश्न विचारण्याची कुवतच नसल्याने,
असतात बिचारे सुखी!
कधी विचारत नाही आम्हाला —
मला काय झालं! आणि औषध काय दिलं!

— माझ्या पेशंटना येत नाही गणित,
गणित येणाऱ्यांना तरी कुठे माहित शून्याची किंमत! अगणित!
— माझ्या पेशंटना साकारी घेणात नाही अब्रू —
किंवा वाचावं लागत नाही, कामशास्त्र —
— माझ्या पेशंटना माहित नाही धर्म, विज्ञान, कला
म्हशी जातात का कधी मारुतीला!
बैलोबा विचारत नाही सूर्य कोणत्या दिशेला उगवला!
भरतनाट्यम् करणारी गाय बघितली का!
सतारीच्या तारा छेडणारं 'बोकड' कुठे दिसलं का!
तबला वाजवणार 'माकड' आठवलं का!
कुणाला पंचाईत पडली या गोष्टींची!

सगळ्या पेशंटनी ठराव केला —
काही झालं तरी मेंदूचा विकास अटकवा
मेंदूच्या विकासातच सर्वनाश —
विकासाची गती करा उलटी —
मेंदूची करा छाटणी —
काही झालं तरी आम्हाला माणूस व्हायचं नाही
असं म्हणणारे माझे पेशंट —
माणसापेक्षा नाही का सुखी!

प्रभाकर जामखेडकर

जामखेडकर
?/३/९१

**Dr. P.P. JAMKHEDKAR**
M.V.Sc., Ph.D.

Reg. No. 393
Maharashtra Vety. Council

PFIZER LIMITED
EXPRESS TOWERS, NARIMAN POINT,
BOMBAY 400 021
PHONE: 2022824. GRAM: PFIZER

(विडंब)

# रिकामटेकडा

काही लोक इतके "बिझी" असतात की त्यांना
नसतो मरायला ही वेळ!
तर काही जणांना "वेळेचं" काय करावं हेच नसतं माहित!

रिकामटेकड्यांचे तरी किती प्रकार!
भिंतीला तुंबड्या लावणारा रिकामा न्हावी!
घरचं खाऊन लष्कराच्या भाकऱ्या भाजणारा!
जितका रिकामा वेळ जास्त, तितकं पद उच्च फार!
आमदार, खासदार, मंत्री, एकेक वाढते प्रकार!

यांचं गणितच व्यस्त — कमी काम, वेळ फार,
अशा स्थितीत होणार काय!
तुमच्या आमच्या मागे भुणभुण फार —

आता हेच बघाना! मला वाटतं सर्वांत मोठा रिकामटेकडा —
म्हणजे देव!
अनादी अनंत काळाचं काय करावं हेच उमगलं नाही त्याला —
विश्वनिर्मितीचा मांडला कसला फापट पसारा —
इतका वाढला, इतका वाढला, काय करावं समजेना!
स्वतःच्या अंगावरचं झेंगट दिलं टाकून —
मेंदूची ट्यूबलाइट भरली माणसाच्या खोपडीत —
जुंपलं मानवी मेंदूला विचारांच्या नांगराला —
अन् परिणाम!
पुन्हा उरला रिकामा वेळ — रिकामटेकडा झाला मोठा!
निर्मित कसला असंख्य विश्व!
आता कुठं या रिकामटेकड्याला आलं भान —
हे कुठवर असं चालणार!
यावर उपाय एकच!
वेळच केला नष्ट तर!

—,—

प्रभाकर जामखेडकर

जामखेडकर
मुंबई
२३।१।

# कोंबडी का अंडे ?

— प्रभाकर जामखेडकर

तुम्हाला विश्वनिर्मितीचं उत्तर पाहिजे ना ?
तर सांगा कोंबडी अगोदर का अंडे ?

कोंबडीपक्ष म्हणतो —
" अंडं कोण देतं ! 'कोंबडी' —
कोंबडीशिवाय अंडं नाही ना मिळत ?
— म्हणजे कोंबडीच नाही का पहिली ? "

अहो, पण "अंड्याशिवाय मिळेल का कोंबडी ?"
— अंडीपक्ष विचारतो.
आणि दोन्ही पक्ष खरे समजले तर ? —

कोंबडी - अंडे — कोंबडी चक्र
सारखं चालत असलं, तरी उत्तर मात्र गवसत नाही —
कोंबडीत किंवा अंड्यात.
होतं काय राव — प्रश्न विचारता तुम्हीच —
अन् उत्तरही देता तुम्हीच !
म्हणजे, जितकं आडात, तितकंच पोहोऱ्यात !

पण कोंबडीला त्याची काय चिंता ?
तिचं अंडी देणं सुरू आहे — विश्वकोंबडी सारखंच —
पण 'प्रश्नोत्तरांच्या' सोपस्काराशिवाय.

मुंबई ५१
22-1-88

# ज्ञाताचा — जन्म (विक ९)

प्रभाकर जामखेडकर

किती शांत सुखी विश्व होत माझं !
मी डुंबत होतो गर्भजलाच्या डोहात;
अज्ञात अंधारात सुखेनैव लोळत होतो !
डोळे असून नव्हती दृष्टी
नाकपुडीत नव्हते श्वास
जीभ असून चव नव्हती
अन् दुःखाचा नव्हता लवलेश !

अन् एके दिवशी का रात्री ! —
कुणीतरी मला ढकलायला सुरवात केली
एका चिंचोळ्या वेदना मार्गातून
पुढे पुढे रेटत होत — कशासाठी कुणास ठाऊक ?
अनंत यातनांतून हे तन,
सरकता सरकता दिसू लागला
प्रकाशाचा किरण — ज्ञाताचा, ज्ञानाचा.
मन म्हणाल, बरा होतो अज्ञाताच्या अंधारात,
पण माझ्या कुठे हातात होत सतत अंधारात डुंबणं ?
प्रकाश मला बोलावित होता — "बाबारे ! प्रकाशात ये"
"प्रकाशात ज्ञान आहे" —
बाहेर पडल्यावर तर माझे डोळेच दिपले —
प्रकाशाच्या झोताने — ज्ञानाचा पहिला श्वास
कोंबला माझ्या नाकपुडीत — अन् मला रडूच
कोसळल — कशाला हा ज्ञानाचा अट्टाहास ?

आज माझी जन्मशताब्दि झाली — ज्ञानमहर्षी म्हणून स्तुती झाली —
पण मला कळून चुकल आहे.
ज्ञात हा अज्ञाताच्या डोहाचा भाग आहे
जसी जसी माझ्या ज्ञाताची कक्षा वाढत आहे
तस तसी अज्ञाताची खोली जाणवत आहे.

मला वाटल — ज्ञाताच्या शोधासाठी जर जन्म असला —
तर अज्ञाताच्या शोधासाठी कदाचित् मृत्यु असावा.
का अज्ञाताच्या शोधासाठीच ज्ञानाचा जन्म असावा ?

मुंबई ५१
२२-१-८८

# कुणाला काय वाटत ?

१०
(रविक)

(१) मीठाला वाटल,
शिराव सागराच्या पाण्यात,
अंदाज घ्यावा तळाचा, आणि सांगाव साऱ्यांना
मी लावला शोध सागर तळाचा !
मीठाने उडी मारली पाण्यात
अन् थोड्याच वेळात विरघळले पार,
तेव्हा पासून सागरजल झाल खारट !
मीठ अजून सागरतळाची खोली मापतच आहे —
पण विरघळलेल्या मीठाला तळ कधी गवसणार का ?

(२) सूर्यप्रकाशाला वाटल,
एकदा भेटाव अंधाराला
प्रकाश किरणांची विजेरी हातात घेऊन
पडला घराबाहेर —

जसजसा प्रकाश पुढे सरकू लागला
तसतसा अंधार मागे सरत चालला
रोज सकाळी सूर्यप्रकाश न चूकता
अंधाराच्या भेटीसाठी निघत आहे —
तेव्हा पासून अंधार प्रकाशाची शिवाशिवी
चालू आहे
आलिकडे आलिकडे प्रकाशाला वाटत
'अंधार' म्हणून काही 'चीज' आहेच का ?
अन् 'अंधारा' पासून 'मी' निराळा आहे का ?
अस असल तर —
मी तरी स्वतःला 'प्रकाश' म्हणून म्हणवून घ्याव का ?
— कुणाला काय वाटत असत कुणास ठाऊक ?

* मुंबई [illegible] ——→ [illegible]

# स्फोटातील शांतता

११ (विक)

प्रभाकर जामरखेडकर

रागावल्याशिवाय माझं कामच होत नाही,
माझ्या शांत शब्दांना अणुस्फोटाची ऊर्जा ~~प्राप्त~~ होत नाही,
दर्जा प्राप्त होत नाही.
शब्द राहतात निष्क्रिय खच्ची केलेल्या वळू सारखे !

'अणुस्फोट म्हणजे विध्वंस' या समीकरणाच
पार कॉक्रीट झालय्, स्फोटातून शांतताही निर्माण होऊ शकते,
ह्यावर या विध्वंसकांचा विश्वासच नाही, कारण
यांच्या नाण्याला बाजू असते एकच !

शांतता असो वा विध्वंस,
ही सारी ऊर्जेची सोंग,
जसा सोंगाड्या, तसे ढंग.
ऊर्जेलाही कधी कधी येतो राग
मग विध्वंसक स्फोटाचा फुगा फोडण पडत भाग.

कर्जत - लोणावळा
रेल्वे प्रवास
७।४।५८



# जड-जीवाचा संकर

जडातून झाला जीव
की जिवास बिलगे जड
हे असे अजूनी गूढ !

जीवास एकच ठावे
जीव तगवित व्हावे
सामना परिस्थितीशी !

जीवाच्या जन्मासाठी
जननाची सारवळी हाती
वाढीचा असे आलेख
बुध्दीची मारी मेख !

जीवाच्या जगण्यासाठी
जडाच्याच आहुती
जडाविण कैसा जीव
हे जड-जीवाचे नाते !

जड म्हणे नाही मज जीव
मज नाही जनन, मरण अन् मन
मी कशाश लढावे, नाही मज 'जीवनज्ञान'

एक जड झाले फितूर
जीवाचा बुरखा घेऊन
प्रवेशिले देहघरात.

हे जड करिते प्रजनन
जीवाच्या गर्भकुशीत
जीवाच्या संगतीविण
हे जड बनते निर्जीव

हे जड-जीवाचे बाळ
संकराचे दावी बळ
"व्हायरस" कर्दनकाळ !

मुंबई ४०००३१
१५-५-९९
रामनगरी

(सही)
(प्रभाकर जानदेकर)

१३
(तलिक)

# मी कुठे जायचे माहित नाही मजला !

रांगेत पुढे सरकता, पोचलो तिकिट खिडकीपाशी
कुठे जायचे, तिकिट कुठले देऊ ?
मी कुठे जायचे माहित नाही मजला
मग प्रवास कुठला, तिकिट कोण दे मजला !
मी सभोवताली बघतो,
पुसतो सार्‍यांना — 'तुम्ही कोठे जाता'?
अंती एकच मिळते उत्तर — खरच ठाव नसे आम्हाला.

वृक्ष म्हणे मज एकच ठावे
बीजातूनी अंकुरित व्हावे
फुलावे फळावे नि विलीन व्हावे.

केवळ बीजनिर्मितिसाठी — कुणी तरी बांधले गाठी
सुटताच बंध गाठीचे — देहाचा प्रवास संपे !
जणू तुटलेला पतंग मीही,
भरकटतो तदनंतर कोठे, माहित नाही मजला !

या विशाल अंतरिक्षात — कालाचे घाली रूळ
विसरला बांधण्या थांबे — सुरवात कुठे अन् कुठे अंत होणार !

एक म्हणाला पक्ष, आम्ही पाहू म्हणतो मोक्ष,
आम्हास मिळाले तिकिट —
राहिले तिकिट तैसेची, गेला कुठे प्रवासी !

मुंबई [illegible]
२५-४-१९८८
रामनवमी.

[signature]
(प्रभाकर जामखेडकर)

# अभंग प्रश्न



विश्वनिर्मितिचे गूढ
उकलण्याच्या फंदात पडला मूढ
गाठी सुटल्यातरी गुंत्यात होते वाढ

मूळात धरले गृहित
विश्व झाले निर्मित
निर्मितीस हवे निमित्त
म्हणूनी गृहितला ईश्वर
चालक विश्वाचा वाकबगार —
मायेची घालुनी फुंकर
बनविल्या वस्तू नश्वर
अशाश्वत क्षणभंगुर —

खोलच खाती अनादि, अनंत अनुशासित
जमा केले त्यामधे काल, अवकाश आणि प्रश्न !
संचारती सर्वत्र ईश्वराचे बुरखे पांघरून.

अनादि कालापासून आजतागायत प्रश्न राहिले अभंग
कोणत्याहि उत्तराचा होतो भंग कालावकाशाच्या मुशीत
प्रश्न जणू ईश्वर
विश्व त्याचे उत्तर

मुंबई ग म ग ३१
२०।१।१९८९

(प्रभाकर नादरेकर)

२५ (विक

# प्रश्नांचे जंगल

कुणी तरी मला सांगितलं —
तुला संपूर्ण ज्ञान पाहिजेना !
मग धारण कर सहा प्रश्नांची आयुधं,
विचारीत सूट — केव्हां ? कुठे ? काय ? कसे ? कुणी व कसे ?
आणि प्राप्त कर सारं ज्ञान —
अहाहा ! किती छान ! आता नको काळजी
सोपं माझं काम — फक्त सरबत्ती ~~काम~~ प्रश्नांची
उत्साहाने मी सपासप ही आयुधं वापरत सुटलो
तशी प्रश्नांची बीजे विखुरली सर्वत्र.
एका बीजा पोटी फळे अनंत प्रश्नांचीच निपजती.
अन् बघता बघता फोफावले जंगल —
अन् मी पुरेपूर गुरफटलो प्रश्नांच्या जंगलात
पार बावरलेलो, भांबावलेलो
मला कळून चुकलं आहे —
प्रश्न विचारण्यात काही अर्थ नाही —
कारण कुठल्याच प्रश्नाला खरं उत्तर नसतं
प्रत्येक प्रश्नाचं उत्तर फक्त प्रश्नच, याबद्दल प्रश्न नाही
प्रश्न म्हणजे अनंताचं कोठार, प्रश्न तर अज्ञानाचं दार
उघडता दार दाट दाट अंधार, प्रश्नांच्या घाण्याभोवती बुद्धी फिरे गरगर
प्रश्न असमर्थ देण्या ज्ञान, प्रश्न असमर्थ सांगण्या सत्य !
तात्पुरते करती समाधान, गुंतागुंत होते छान.
मला माहित नाही, प्रश्नांचा पडला दुष्काळ
काय करील हा वाचाळ
मी मात्र आता प्रश्न विचारण्या ऐवजी
देत असतो फक्त उत्तर " तोच मी, तोच मी "
प्रश्न जर असला ईश्वर तर विश्व त्याचे उत्तर —
असेल कां !

गोपाळकृष्ण
१४/६/८२

# जन्म - मृत्यू

जन्म-मृत्यू म्हणजे, एका रबरबँडचे दोन (२) बिंदू 'अ' आणि 'ब'
तुम्हाला म्हणायचाच असेल तर,
'अ' ला म्हणा जन्म आणि 'ब' ला मृत्यू !
ताणलेल्या रबरावर 'अ' जातो 'ब' पासून दूर,
'अ' आणि 'ब' मधले अंतर वाढले, म्हणजे घडते जीवन किंवा आयुष्य
रबरावरचा ताण सोडताच, 'अ' आणि 'ब'-ची पडते गाठ !.

कुणी तरी रबर ताणत असत
जन्मापासून मृत्यूला रेखत असत
जन्म जन्म घेत असतो;
मृत्यूलाही जन्म देत असतो.

आता विचारू नका- रबरावरच 'अ' आणि 'ब' का ?
आणि फूटपट्टीवर का नाही ?
उत्तर तुम्हालाही माहित आहे-
रबर ताणता येत - फूटपट्टी नाही.
म्हणून फूटपट्टीला आयुष्य मोजता येत नाही
जन्म-मरणाला खेचणारा 'काल'च
हे दोन बिंदू ताणू शकतो.

जन्मच जर मेला - तर मृत्यू कसा जगेल ?
अन् मेलेल्या मृत्यूपासून, जन्म कसा जन्मेल ?

किंवा असे तर नाही ना कि
जन्माला जन्म नाही आणि मृत्यूलाही मृत्यू नाही !
काही असल तरी, जन्म-मृत्यूचं कोडं अजून उलगडत नाही !

—— x o x ——

मुंबई
५-९-१९८८

[illegible]
( [illegible] )

# प्रतिभेची वाट

सरळ सोट
मऊ पाठ
सपाट वाट
तीच वहिवाट
मला नाही मोहवत !
मला लोभविते –
बिकट वाट
नागमोडी घाट
खड्डे खुड्डे
काटे कुटे
किर्ऽऽणारे रातकिडे
मला आवडतो –
ढगांचा गडगडाट
वीजेचा कडकडाट
लाटांचा खळखळाट

मला आवडते –
वादळ घुसळणारे
क्षणाक्षणाला बदलणारे
बदलातून निर्मिणारे
बदलाचे निसर्ग गाणे
मला मोहविते –
न सरणारी वाट
प्रतिभेची वाट
ही बिकट वाट !

गायकवाड
२०।८।१९८८
मुंबई
(प्रभाकर गायकवाड)

# 'मी दगड'

'मी दगड'
मला नाही जीव, मन आणि अक्कल!
हे "शहाणे" म्हणतात —
अक्कलहीनाला हीन लेखण्यासाठी
करतात माझ्या नावाचा वापर
'दगडोबा' म्हणून!

अन्, मलाच बनवितात देव!
मीच सोसतो छीनीचे घाव
लादलेल्या देवपणामुळे, मी हो
सर्वज्ञ — जागृत, दयाळू, बुद्धिदायक
टेकवितात माथा 'दगडोबाच्या' चरणाव

मला थांगपत्ता लागत नाही या मानवी मनाच
दगड एकच पण त्याचा होतो दगडोबा किंवा देव
याला म्हणावी का अक्कल!
खर खोटं पारखण्यासी!

Jamkhedkar
७.३.९०
३.२५

# नाव

सारे म्हणती नावात काय आहे?
अन् सरसकट लागतात नावापाठीमागे

साधी गोष्ट घ्या कावळ्या-चिमणीची
एक होता कावळा - एक होती चिमणी
आणि शेवटी चिमणीच घर गेलं राहून
- कावळ्याचं घर गेलं वाहून .-
पण पिढ्यान् पिढ्या या गोष्टीनं घर केलं मनात

गावं आली वाहून गेली
शहरं गाडली गेली भूतलीं
संस्कृतिचा शोध घ्यावा लागतो
उत्खनन करून !

स्मृती पुनर्जन्म घेते पिढ्यान् पिढ्या
नावाचा झेंडा खांद्यावर फडकावीत

जे वाहून जातं ते गाव
पण मागे राहतं ते मात्र नाव.

— प्रभाकर जामदेकर
मुंबई

१६/८/८७

# ओळख

(विक) 20

तुम्हाला कधीच माझी ओळख पटणार नाही
कारण मी आहे का नाही हेच तूला माहित नाही !
ओळख पटायला मी अस्तित्वात तरी हवा ना!
पण तुमच्यापैकी काही म्हणतात —
त्यांच्या अस्तित्वासाठी माझी काहीच गरज नाही

आता समजा मी आहे —
तरी तू मला कसा ओळखणार !
मला नाही रंग, रूप, वास, वाणी, नजर
तुझ्यासारखा मला नाही चेहरा मोहोरा
माझ्या मनगटी नाही घड्याळ
देखाव्याची मला नाही सवय
अशा मला तू कसा ओळखणार !
तुझ्या जवळ नाही खास दुर्बिण की 'क्ष' किरणे
अन् समजा मी नाही —
तर मग ओळखण्याचा प्रश्नच नाही !
पण मग प्रश्न पडतो — मी नाही तर तू कसा ?
अन् तुझ्याशिवाय मी कसा !

खर तर मला ओळखण्याची काहीच गरज नाही
मी असो वा नसो – मी माझ्या छंदात
तसा मी तुमच्या फंदात पडत नाही
ओळखदेख हे तुमचे (पोर!) खेळ
उगाच मला खेचता, कारण तुम्हाला आहे वेळ !

अन् चुकून माझी ओळख पटली
तर तूला समजेल
"तू" "मी"च आहे !

[illegible]
६-६-९१.

ओळख

# मृत्यूचा मृत्यू

जन्मा सवेच मृत्यू घेतो जन्म
हातात घेऊनी हात निघती दोघे प्रवासास
अन् जीवन कंठित फिरती या अवकाशात

एकाच क्षणी मी असतो जीवंत किंवा मृत
जीवंत असता वाटे, मी मृत्यूवर केली मात !
मृत्यू मला करू शकेना स्पर्श !

मृत्यू जोवरी देतो साथ
असतो तोवरी जीवनासी अर्थ

आणि एकाएकी मृत्यू घेतो जीवनाशी कट्टी
मग संपुष्टात येते जन्म मृत्यूची गट्टी

का हे जीवन क्षणभंगूर ?
का मृत्यूही क्षणभंगूर ?
का जीवन आहे सत्य ?
का मृत्यू हेच सत्य ?

दोघांची असता गट्टी, जीवन भासे सत्य
होताच तयांची कट्टी, सत्य भासे असत्य
जीवनास नुरे अर्थ, सुटताच मृत्यूची संगत
कोलमडले जीवन त्याच क्षणी,
मृत्यूचा होता मृत्यू !

१५-११-९२
मुंबई.
१६।११ - सोमवार मंडळ, वांद्रे पूर्व,
प्रथम वाचन.

(प्रभाकर आमरेकर)

# ॥ माझी जन्म तारीख ॥

२०·१०·३२

काय माझी जन्म तारीख !
समजा १०-१०-३२, झालं समाधान ?
काही झाला का बोध माझ्या जन्माचा ?

पण ही माझी खरी जन्म तारीख म्हणता येईल का ?
कारण त्या अगोदर नऊ महिने मी होतो मातेच्या कुशीत —
चंद्रकलेसम वाढत !
— अन् त्या अगोदर मी होतो माता-पित्यांच्या रूपात —
अन् त्याही अगोदर आजा-आजीच्या, पणजोबा-पणजीच्या -
अगदी खापर खापर पणजा-पणजी पर्यंत —
तर कुणी माझा जन्म घेऊन जातील पहिल्या जलचर जीवापर्यंत —
अन् त्याही पुढे कुणी संबंध जोडेल काही ग्रहताऱ्यांवरील
धुळीशी, राखोड्याशी !

आता नक्की जन्म तारीख सांगण्यासाठी नको का दीनदर्शिका !

— खर तर मी अनादि.
मला नाही जन्म तारीख

— अगोदरचा जीव विझण्यापूर्वी
दूसरी जीवपणती चेतवीत जातो
जीवाची दिवाळी साजरी करीत -
अनादि काळापासून

१८-११-१९९२
मुंबई
(सौ. प्रभा, ५० वा वाढदिवस)

# मृत्यूचा मृत्यू

जन्मा सवेच मृत्यू घेतो जन्म
हातात घेऊनी हात निघती दोघे प्रवासास
अन् जीवन कंठित फिरती या अवकाशात

एकाच क्षणी मी असतो जीवंत किंवा मृत
जीवंत असता वाटे, मी मृत्यूवर केली मात!
मृत्यू मला करू शकेना स्पर्श!

मृत्यू जोवरी देतो साथ
असतो तोवरी जीवनासी अर्थ

आणी एकाएकी मृत्यू घेतो जीवनाशी कट्टी
मग संपुष्टात येते जन्म मृत्यूची गट्टी

का हे जीवन क्षणभंगूर?
का मृत्यूही क्षणभंगूर!
का जीवन आहे सत्य?
का मृत्यू हेच सत्य!

दोघांची असता गट्टी, जीवन भासे सत्य
होताच त्यांची कट्टी, सत्य भासे असत्य
जीवनास नुरे अर्थ, सुटताच मृत्यूची संगत
कोलमडते जीवन त्याच क्षणी,
मृत्यूचा होता मृत्यू!

१५-११-९२
मुंबई
१६/११ - सोमवार मंडळ, वांद्रे पूर्व,
प्रथम वाचन

(स्वाक्षरी)
(प्रभाकर आमरेवडकर)



# माणूस



२४
(निकि)

उत्तर देणारा प्राणी म्हणजे माणूस
याला सदान् कदा उत्तर देण्याचा हव्यास !
तेही स्वतःच म्हणा, कारण हाच एक 'प्रश्नकर्ता' प्राणी !

प्रश्न विचारण्याची 'पंचाईत' (बुद्धी) नाही अमिबाला
बॅक्टेरियाला, गांडूळाला, गाढवाला, बोकडाला किंवा माकडाला !
आपण बरे की आपले जग बरे, कशाला हवी ज्ञानलालसा !

प्रश्न विचारण्याचा फंडाला त्यानं नाव दिलं 'तर्क'
प्रश्न उत्तराची रस्सीखेच, वाटले उत्तराची होईल सरशी !
उत्तरांची होता सरबत्ती, प्रश्नांची होईल कंबख्ती !

या प्राण्याचा अट्टाहास, "मला झालं(च) पाहिजे संपूर्ण ज्ञान"
गवसलं पाहिजे "विश्वाचं रहस्य", "सत्य", "आत्मा" त्याचं राहण्याचं
ठिकाण आणि बरंच

अन् देत सुटला उत्तरे — एक ना अनेक
पण गंमत अशी, प्रत्येक उत्तर ठरलं थातूरमातूर !

उत्तराने जर प्रश्नाची भागली तहान
तरच प्रश्नोत्तराने प्राण्याचा विकास किंवा विनाश !

मग प्रश्नच का झाला निर्माण !
इतरांपासून 'माणूस' ओळखण्यासाठी !

(प्रभाकर जामखेडकर)
१८.११.९२
(सौ. प्रभा[?] ... नाईकवडे[?])

काय विचित्र हा प्राणी माणूस नावाचा
आम्हा सर्वांना लाज वाटते,
त्याला 'प्राणी' म्हटल्याने,
हा तर आमच्या प्राणी जातीचा घोर अपमान!

याचं मन किती कोतं, किडलेलं,
स्वतःच वर्णन करण्यासाठीही
शब्द नाही त्याच्या भाषेत,
शूरांना म्हणतात नरसिंह, नरशार्दूल, नरपुंगव,
तर 'बेअक्कलास' म्हणतात 'गाढव'
लांगूलचालन करणारा ठरतो 'कुत्रा'

- पण आम्हा प्राण्यात अन् यांच्यात,
आहे फरक मूलभूत.
आम्ही म्हणतो —
घोषणा देतो तो माणूस
भावाभावांचे गळे कापतो तो माणूस
नीतिधर्म पाळत नाही तो माणूस
संतुलन बिघडवतो तो माणूस

दंगल करतो तोच माणूस —

25-9-93

# अभंग प्रश्न

पूर्ण (विक)

विश्वनिर्मितिचे गूढ
उकलण्याच्या फंदात पडला मूढ
गाठी सुटल्यातरी गुंत्यात होते वाढ

मूळात धरले गृहित
विश्व झाले निर्मित
निर्मितीस हवे निमित्त
म्हणूनी गृहितला ईश्वर
चालक विश्वाचा वाकबगार —
मायेची घालुनी फुंकर
बनविल्या वस्तू नश्वर
अशाश्वत क्षणभंगुर —

खोलली खाती अनादि, अनंत अन् शाश्वत
जमा केले त्यामधे काल, अवकाश आणि प्रश्न !
संचारती सर्वत्र ईश्वराचे बुरखे पांघरून.

अनादि कालापासून आजतागायत प्रश्न राहिले अभंग
कोणत्याहि उत्तराचा होतो भंग कालावकाशाच्या मुशीत
प्रश्न जणू ईश्वर
विश्व त्याचे उत्तर

मुंबई [illegible]
२०।४।१९८८

[illegible]
(प्रभाकर जामदरवडकर)